# आता पावती विना मिळणार आधार कार्ड

शासनाच्या विविध योजनासाठी आधार कार्ड आवश्यक आहे परंतु नागरींकाकडे ना आधारची पावती आहे नाआधार कार्ड त्यामुळे शासकीय योजनेचा लाभ घेण्यापासुन नागरीक वंचीत राहु नये यासाठी जिल्हा प्रशानानाने ज्यांचे आधार कार्ड गहाळ झाले आहेत त्यांना आता महा ई सेवा केंद्रातुन तत्काळ आधार कार्ड मिळण्याची सुविधा जिल्हा प्रशासनाकडुन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विविध शासकीय कामासाठी आणि ओळखीचा पुरावा म्हणुन नागरीकांचे आधार कार्ड काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. बहुतांशी नागरीकांना आधार कार्डही प्राप्त झालेले आहे परंतु काही जणाना कार्ड काढण्याची प्रक्रिया पुर्ण करुन झाल्यानंतरही कार्ड मिळाले नाहीत काही जणांकडे प्राथमिक दिलेली पावतीही गहाळ झालेली आहे,तर काहींना आधार कार्ड मिळाले परंतु गहाळ झाल्याचे प्रकार पुढे आले आहेत त्यामुळे जिल्हा प्रशासनाने ही सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे जिल्ह्यातील ४१ महा ईसेवा केंद्रातुन ही सुविधा नागरीकांना उपलब्ध होणार आहे तरी नागरीकांनी या केंद्रात जाउन आपले स्वत:चे आधार कार्डवरचे नाव किंवा प्राथमिक आधार पावती वरील नंबर केंद्राकडे दिला की आधार कार्ड शोधुन देण्यात येणार आहे या सुविधेचा फायदा नागरीकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. आधिकृत आधार केंद्राची यादी -

**अंबड तालुका**: अंकुशनगर,शहागड,,पिंपळगाव,गोंदी, दह्याळा,,जिर्पी,वडीगोद्री.

**बदनापुर तालुका**: रोशंगाव,शेलगाव, दाभाडी,वाकुळनी बदनापुर बस्थांनका जवळ,वाल्हा.

**भोकरदन तालुका**: राजुर,,भोकरदरन पं स जवळ, तळेगाव,,धनगरवाडी,सांवगी.

**घनसांवगी तालुका**: शेवता, घनसांवगी पं स जवळ,खंदारी,कुंभार पिंपळगाव.

**जाफ्राबाद तालुका** : नेरखेडा, जाफ्राबाद बस्थांनका जवळ, जाफ्राबाद पं स जवळ,गोंदेगाव.

**जालना तालुका**: मस्तगड, काद्राबाद,तह.जालना जवळ,गोंदेगाव,देवमुर्ती,भाटेपुरी,विरेगाव.

**मंठा तालुका**: तह. मंठा जवळ,जयपुर,वाटुर,तळणी,वंजाळ नाका,मंठा बाजार समिती.

**परतुर तालुका**: नविन मोंढा परतुर,फुलवाडी.